PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/47/ of 2024**

## परिपत्रक:

**विषयः दि. २४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी ठाणे येथे विभागीयस्तरीय महारोजगार मेळाव्याचे आयोजना मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होणेबाबत.**

संदर्भः—श्री निधि चौधरी, भाप्रसे आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क. कौविरोउआ/कक्ष—८/योजना/प्र.क्र. ३/२४/१२८९—९७ दिनांक ६ फेब्रुवारी, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, मा. उप मुख्यमंत्री यांचे सुचनेनुसार दि. ९ व १० डिसेंबर, २०२३ रोजी नागपूर येथे महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यास एकूण ३४० उद्योजक/प्लेसमेंट एजन्सीज सहभाग होता व त्यांचेमार्फत ४८,५४१ रिक्तपदे अधिसूचित करण्यात आली होती. सदर मेळाव्यास ३०,५४० उमेदवार उपस्थित व त्यापैकी ११,०९७ उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली.

याच धर्तीवर मुंबई/कोकण विभागस्तरीय महारोजगार मेळाव्याचे २४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी हायलँड ग्राउंड, ढोकाळी, माजिवडा, ठाणे येथे आयोजन करणेबाबत मा. मुख्यमंत्री यांनी उपरोक्त बैठकीत सूचित केले आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणास तात्काळ संदर्भाकरिता सोबत सदर करण्यात येत आहे.

सदर मेळावा अत्यंत व्यापक स्वरूपाचा राहणार आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रातील उद्योजक, उद्योजक संघटना, प्लेसमेंट एजन्सीज त्यांचे कडील रिक्तपदे अधिसूचित करून विद्यार्थ्यांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देणार आहेत. तसेच, मेळाव्यात स्वयंरोजगाराच्या योजना राबविणारे विभाग/ महामंडळाच्या योजनांची माहिती युवकांना होण्यासाठी सबंधित विभाग/महामंडळ मेळाव्यात सहभागी होणार आहेत.

तरी, सदर मेळाव्याद्वारे उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी कोकण विभागातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकत असलेले अथवा मागील तीन वर्षात उत्तीर्ण अथवा नोकरी इच्छुक विद्यार्थ्यांना उपरोक्त मेळाव्यात सहभागी होणे बाबत सूचित केल्यास सदर उमेदवारांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होऊन ते आत्मनिर्भर होतील. सदर मेळाव्यात उमेदवारांना सहभागी होणेकरीता https://qr-codes.io/gdhSNd या लिंकच्या सहाय्याने नोंदणी करणे आवश्यक आहे. तरी, सदर नोंदणीची कार्यवाही करणे करिता महाविद्यालयाच्या एका व्यक्तीस समन्वयक म्हणून नेमणूक करावी.

तरी सोबत जोडलेल्या परिपत्रका नुसार महाविद्यालयांनी अंमलबजावणी करावी.

ठिकाण मुंबई—४०० ०३२
दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय
कोकण भवन (विस्तारीत), ३ रा मजला, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
संकेतस्थळ:www.mahaswayam.gov ई-मेल dese.desk8@gmail.com
दूरध्वनी क्रमांक- २७५७ १९४२ / ४४

जा.क्र.कौविरोउआ/कक्ष-८/योजना/प्र.क्र. ३/२४/१२८९-९८ दि.०६.०२.२०२४

प्रति,
मा.प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय :- दि.२४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी ठाणे येथे विभागीयस्तरीय महारोजगार मेळाव्याचे आयोजना मध्ये महाविद्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी होणेबाबत....
संदर्भ :- मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२९ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न बैठक.

महोदय,

मा.उप मुख्यमंत्री यांचे सुचनेनुसार दि.०९ व १० डिसेंबर, २०२३ रोजी नागपूर येथे महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यास एकूण ३४० उद्योजक/प्लेसमेंट एजन्सीज सहभाग होता व त्यांचेमार्फत ४८,५४१ रिक्तपदे अधिसूचित करण्यात आली होती. सदर मेळाव्यास ३०,५४० उमेदवार उपस्थित व त्यापैकी ११,०९७ उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली.

याच धर्तीवर मुंबई/कोकण विभागस्तरीय महारोजगार मेळाव्याचे दि.२४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी हायलँड ग्राउंड, ढोकाळी, मांजिवडा, ठाणे येथे आयोजन करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांनी उपरोक्त बैठकीत सूचित केले आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणास तात्काळ संदर्भाकरिता सोबत सदर करण्यात येत आहे.

सदर मेळावा अत्यंत व्यापक स्वरूपाचा राहणार आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रातील उद्योजक, उद्योजक संघटना, प्लेसमेंट एजन्सीज त्यांचे कडील रिक्तपदे अधिसूचित करून विद्यार्थ्यांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देणार आहेत. तसेच, मेळाव्यात स्वयंरोजगाराच्या योजना राबविणारे विभाग/ महामंडळाच्या योजनांची माहिती युवकांना होण्यासाठी सबंधित विभाग/महामंडळ मेळाव्यात सहभागी होणार आहेत.

तरी, सदर मेळाव्याद्वारे उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी आपल्या अधिनस्त विद्यापीठाच्या कुलगुरू यांना त्यांचे अधिनस्त कोकण विभागातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकत असलेले अथवा मागील तीन वर्षात उत्तीर्ण अथवा नोकरी इच्छुक विद्यार्थांना उपरोक्त मेळाव्यात सहभागी होणे बाबत सूचित केल्यास सदर उमेदवारांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होऊन ते आत्मनिर्भर होतील. सदर मेळाव्यात उमेदवारांना सहभागी होणेकरीता https://qr-codes.io/gdhSNd या लिंकच्या सहायाने नोंदणी करणे आवश्यक आहे. तरी, सदर नोंदणीची कार्यवाही करणे करिता महाविद्यालयाच्या एका व्यक्तीस समन्वयक म्हणून नेमणे बाबत सुद्धा सूचित करावे अशी विनंती आहे.

तरी, याबाबत आपल्या स्तरावरुन मा.कुलगुरू यांना सूचना दिल्यास मी आपली अत्यंत आभारी राहीन.

(निधि चौधरी) भाप्रसे
आयुक्त
कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता
आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, चौथा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : vishi५.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकिर्ण -२०२४/ प्र.क्र. १ / विशि-५
प्रति -
दि.०६/०२/२०२४

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय , पुणे. / संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय , मुंबई / संचालक, कला संचालनालय, मुंबई. मुंबई.

सर्व कुलसचिव (१) मुंबई विद्यापीठ, मुंबई (२) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई (३) डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई (४) हैदराबाद सिंध नॅशनल कॉलेजीएट विद्यापीठ (HSNC University), मुंबई (५) डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि. रायगड.

विषय : दि. २४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी ठाणे येथे विभागीय स्तरीय महारोजगार मेळाव्याचे आयोजनामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होणेबाबत कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांच्या सुचना

संदर्भ : आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय , नवी मुंबई यांचे क्र. कौविरोउआ/कक्ष८/योजना/प्र.क्र.३/२४/१२८९-९८, दि ६/२/२०२४ चे पत्र

महोदय,

विषयांकित संदर्भाधीन पत्र सोबत जोडले आहे. दि. २४ व २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी ठाणे येथे आयोजित विभागीय स्तरीय महारोजगार मेळाव्याचे आयोजनामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होणेबाबत प्रस्तुत पत्रामध्ये नमूद सुचना आपल्या स्तरावर सर्व महाविद्यालयांना तात्काळ देण्यात याव्यात.

२. प्रस्तुत पत्रामध्ये सदर मेळाव्याद्वारे उमेदवारांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध होण्याकरिता आपल्या अधिनस्त **विद्यापीठाच्या कुलगुरु यांना त्यांचे अधिनस्त <u>कोकण विभागातील शैक्षणिक संस्था</u>, महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकत असलेले अथवा मागील तीन वर्षात उत्तीर्ण** अथवा **नोकरी इच्छुक विद्यार्थ्यांना उपरोक्त मेळाव्यात सहभागी होण्याबाबत सूचित केल्यास** सदर उमेदवारांना विविधी संधी उपलब्ध होऊन ते आत्मनिर्भर होतील असे कळविण्यात आले आहे. **सदर मेळाव्यात उमेदवारांना सहभागी होण्याकरिता https://qr-codes.io/gdhSNd या लिंकच्या सहायाने नोंदणी करणे आवश्यक आहे.**

३. तरी सदर नोंदणीची कार्यवाही करणे करिता संबंधित महाविद्यालयाच्या एका व्यक्तीस समन्वयक म्हणून नेमणे बाबतसुद्धा सूचित करावे अशी विनंती आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

आपला,

(शरद कोकाटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत - आयुक्त, कौशल्य विकास ,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
कोकण भवन (विस्तारीत), ३ रा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.